संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मुंढेंची बदली की राजकीय बदला

**नवी** मुंबई महापालिका आयुक्त तुकाराम मुंढे यांची झालेली तडकाफडकी बदली अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरली आहे. नवी मुंबईतल्या अनधिकृत बांधकामांविरोधात मोहीम छेडणाऱ्या या आयुक्तांविरुध्द नवी मुंबईतील जवळपास सगळे राजकीय पक्ष एकत्र आले होते. भारतीय जनता पार्टीचे तात्पुरते समर्थन वगळता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः मुंढे यांच्या कारवाईला पाठिंबा दिला होता. परंतु हा पाठिंबा तात्विक नव्हता, तर पूर्णपणे राजकीय होता. यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. मुंढे यांची अधिवेशन चालू असताना इतक्या तातडीने बदली होईल, असे कोणालाही वाटले नव्हते. नव्या मुंबईतल्या आतापर्यंतच्या कारवाईत अन्य राजकीय पक्षांना फटका बसला होता. परंतु, तिथल्या राजकीय पक्षांना मुंढेंच्या मार्फत परस्पर उत्तर मिळते आहे, हे लक्षात घेऊन त्यांना अभय देण्याचे काम राज्य सरकारने केले. परंतु, न्यायालयातल्या एका याचिकेच्या संदर्भात मुंढे यांनी राज्य सरकारचे अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे धोरण चुकीचे असल्याचे स्पष्टपणे सांगितल्यामुळे राज्य सरकारच्या शेपटावरच पाय दिला गेला आणि चवताळलेल्या सत्ताधाऱ्यांनी अखेर मुंढे यांची उचलबांगडी केली. हा प्रकार म्हणजे नियमाप्रमाणे काम करणाऱ्यांना किती विविध प्रकारच्या अडचणींशी सामना करावा लागतो, याचे उत्तम उदाहरण ठरते. सगळे राजकीय पक्ष एकाच माळेचे मणी असतात. प्रशासनाने किंवा अधिकाऱ्यांनी नियमानुसार काम केले पाहिजे, असे तुणतुणे ते नेहमी वाजवतात. परंतु यातला खरा अर्थ असा असतो की, मनमानी करताना या अधिकाऱ्यांनी स्वतःचे नियम आडवे आणू नयेत, अशी त्यांची अपेक्षा असते. ज्यावेळेला तुकाराम मुंढे, श्रीकर परदेशी यांच्यासारखे अधिकारी जेव्हा कठोरपणे प्रशासनाचा कारभार पाहतात, त्यावेळेला त्यांच्या प्रामाणिकपणालाच खोटे ठरवण्याचा किंबहुना आपल्या स्वार्थासाठी अशा अधिकाऱ्यांपुढे राजकीय आव्हान पुढे करण्याचा प्रयत्न केला जातो. पिंपरी, चिंचवड महानगरपालिका हद्दीत अशाच अनधिकृत बांधकामांविरुध्द श्रीकर परदेशी यांनी जोरदार मोहीम उघडली होती. सगळ्या राजकीय पक्षांनी त्यांच्या या मोहिमेला विरोध केला होता. या राजकीय दबावाचा अखेरीस विजय झाला आणि त्यावेळी परदेशी यांची मराठवाड्यात बदली केली गेली होती. आता त्यांना दिल्लीत स्थान मिळाले आहे, हा भाग जरी वेगळा असला तरी राज्यात प्रामाणिकपणाचे मूल्य काय आहे हे तुकाराम मुंढेंच्या मुदतपूर्व बदलीतून सिध्द होते. ज्या पारदर्शक कारभाराच्या वल्गना राज्य सरकार करीत असते. त्याचा विचार केला तर पारदर्शक कारभार करणाऱ्या मुंढेंच्या बदलीचे कारणच काय? असा प्रश्न निर्माण होतो आणि मग मुंढेंच्या बदलीमागची हीच का ती पारदर्शकता, असाही दुसरा प्रश्न उभा राहतो.

### हीच का ती पारदर्शकता?

सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या हा प्रशासनाच्या व्यवस्थेचा अंतर्गत भाग आहे, अशी ही नेहमीची तबकडी राज्यकर्ते नेहमी वाजवत असतात. एकट्या मुंढेंची बदली झाली असती तर आणखी संशय आला असता. आणखी दोघातिघांची बदली करून राज्य सरकारने या बदलीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. तीन वर्षांची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच त्यांच्या बदलीचा निर्णय घेतला गेला आणि म्हणून हा विषय केवळ मुंढेंच्या बदलीपुरता मर्यादित राहात नाही तर सरकारी धोरणाविरोधात भूमिका घेतल्याचा तो बदला ठरतो. आतापर्यंत मुंढे यांनी चालवलेली मोहीम नव्या मुंबईपुरती मर्यादित होती. मात्र या अनधिकृत बांधकामांविरोधात न्यायालयात चर्चा उपस्थित झाल्यानंतरही अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा अगदी वर्षभरापूर्वी सरकारने घेतलेला निर्णय हादेखील मूलभूत धोरणाला छेद देणारा असल्याचे प्रतिपादन मुंढे यांच्यावतीने केले गेलेले दिसते. विशेष म्हणजे न्यायालयानेसुध्दा सरकारच्या अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या निर्णयाला बेकायदा ठरवले आणि सरकारला सणसणीत चपराक हाणली. म्हणजे एकीकडे मुंढेंच्या बदलीतून बदला घेण्याचे काम केले जात असताना दुसरीकडे न्यायालयाने सरकारच्या तथाकथित पारदर्शक कारभाराचेच वाभाडे काढलेले आहेत. सरकारी आदेशाप्रमाणे मुंढेंना अन्य कुठेतरी रुजू व्हावे लागेलच. तो सरकारचा अधिकार असल्यामुळे त्याला आव्हान देण्याच्या भानगडीत मुंढेंसारखे कोणतेच प्रामाणिक अधिकारी पडत नाहीत. परंतु, ते जिथे जातील तिथे आपले कर्तव्य चोखपणे बजावत राहातात. असे म्हटले जाते की, मुंढे यांना अधिक चांगल्या ठिकाणी नियुक्त केले जाण्याची शक्यता आहे. परंतु, ही काही बदलीची भरपाई ठरू शकत नाही. त्या त्या अधिकाऱ्यांना आपले काम करण्यासाठी किमान तीन वर्षे संधी दिली पाहिजे.

### राजकीय शिकारबाजीला विरोध

महाराष्ट्रात असे काही मोजके अधिकारी होऊन गेले आहेत की, ज्यांनी सरकारचा किंवा राज्यकर्त्यांचा वेळोवेळी रोष ओढवून घेतल्याचे दिसून येते. मुंबई महापालिकेत अशीच तडाखेबंद आयुक्तपदाची कारकिर्द केलेले सदाशिव तिनईकर हे अजूनही लोकांच्या लक्षात आहेत. तर याच महापालिकेत राहून अनेक गुंड पुंडांच्या अनधिकृत बांधकामांवर हातोडा उगारणाऱ्या गो. रा. खैरनार यांचीही कारकिर्द लोकांच्या स्मरणात आहे. काम करताना हे अधिकारी ज्यावेळेला कायद्याचा आणि नियमांचा आधार घेतात, त्यावेळेला जनतेचे हित अशीच साधारणपणे त्यांची भूमिका असते. केवळ कोणाविरुध्द आकसाने कारवाई करावी, असा त्यामागचा हेतू नसतो आणि तसे करून त्यांना चालणारही नाही. सरकारी व्यवस्थेत काम करताना आपल्या वाट्याला आलेले काम हे अधिकाधिक प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न होत असतो. मात्र अनेकवेळेला अशा अधिकाऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकीय शिकारबाजीही होत असते. तुकाराम मुंढे यांनी मात्र ती होऊ दिलेली दिसत नाही. आपली मोहीम त्यांनी नवी मुंबई पुरतीच राबवत असताना सरकारचे अनधिकृत बांधकाम नियमित करण्याचे धोरण व्यापक अर्थाने परवडणारे नाही. हेदेखील लक्षात आणून देण्याचे काम केलेले आहे.